या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

पाटोदा **संचार** PATODA SANCHAR

E-mail-pat.sanchar@gmail.com संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे संपादक-विलास डोळसे




❑ पाटोदा/बीड ❑ स्थापना वर्ष ३५ वे, वर्ष २० वे ❑ अंक ५७ वा ❑ गुरुवार दि.३ एप्रिल २०२५ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑ पो.र.नं.एल/एसबी/बीड/रनंप-२२१/२०२५-२७ ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

❑ PATODA/BEED ❑ YEAR 20 th ❑ Issu -57 ❑ Thursday 3 April 2025 ❑ Page- 4 Price- Rs.1. ❑ Post.Reg.No.L/SB/Beed/RNP-221/ 2025-27 ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

# आजचे पुढारी पाया पडण्याच्या लायकीचे नाहीत पण चुलत्याच्या कृपेने आमचं बरं चाललंय! अजित पवार

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार बीड दौऱ्यावर असताना त्यांच्या भाषणाने राजकीय वर्तुळात खळबळ उडवली. आई-बापाच्या आणि चुलत्याच्या कृपेने आमचं बरं चाललंय, असं वक्तव्य करत त्यांनी अप्रत्यक्षपणे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांचा उल्लेख केला.

यावेळी अजित पवार यांनी तरुणांना पुढाऱ्यांच्या पाया पडण्याऐवजी त्यांच्या इतिहासाचा विचार करण्याचा सल्ला दिला. आजचे पुढारी पाया पडण्याच्या लायकीचे नाहीत, असे म्हणत त्यांनी राजकारण्यांवर तिखट शब्दांत टीका केली.

सोशल मीडियाच्या गैरवापराबाबतही अजित पवार यांनी इशारा देत म्हटले, गैरसमजात राहू नका, टेक्नॉलॉजी खूप पुढे गेली आहे, चुकीचे मेसेज पाठवले आणि अडकलात तर मी सोडवायला येणार नाही.

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी प्रवृत्ती आणि गँगविषयी बोलताना, राख गोळा करणारी गँग, वाळू तस्करीची गँग, भूखंड गँग यांना सरळ करणार, असे अजित पवार यांनी ठणकावले.

राजकीय, सामाजिक आणि विकासकामांवर सडेतोड भाष्य करत, बीड जिल्ह्यात लवकरच विमानतळ आणि इनोव्हेशन सेंटर उभारण्याचा मनोदयही अजित पवार यांनी व्यक्त केला.

आपल्या बीडमधील भाषणात अजित पवार यांनी युवकांना उद्देशून अनेक मोलाचे सल्ले दिले. बोलताना भान बाळगा हे सांगत असतानाच पुढाऱ्यांच्या पाया पडायचं असेल तर त्याची हिस्ट्री आठवा असाही सल्ला दिला. तसंच माझ्या पाया पडायला येऊ नका, हार, टोप्या, मानचिन्ह काही देऊ नका. आपल्याला पुढे जायचं असेल तर सर्वधर्म समभाव जपला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातींना सगळ्या समाजांना घेऊन स्वराज्याची स्थापना केली. विशिष्ट समाजाचेच लोक महाराजांच्या दरबारी होते असं काहीजण सांगतात त्याला काही अर्थ नाही. महाराजांच्या दरबारी अल्पसंख्याक समाजातलेही लोक होते. एका धार्मिक स्थळाजवळ जिलेटिन उडवण्यात आले ही विकृती आहे, असे अजित पवार म्हणाले.

## बीडमध्ये रेल्वे यायला विलंब झाला, त्याला जबाबदार कोण?

बीडमध्ये रेल्वेचं काम किती वर्षे चाललं आहे, हा प्रश्न बीडकरांनी स्वत:ला विचारला पाहिजे. बीडमध्ये रेल्वे यायला इतका विलंब झाला, त्याला जबाबदार कोण? कोणीतरी याची नैतिक जबाबदारी घेतली पाहिजे. कोणीतरी येणार आणि जादूची कांडी फिरवून काम करणार, असं होत नसतं. त्यासाठी पाठपुरावा करावा लागतो. मी आता माझ्या एका अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. मंत्रालयातही सेक्रेटरी लेव्हलचा माणूस नेमला आहे. या माध्यमातून पाणी, वीज, बीडमधील राष्ट्रीय महामार्ग, शक्तिपीठ महामार्ग, विमानतळ यावर देखरेख ठेवली जात आहे, असेही अजित पवार यांनी सांगितले.

## सर्वांची अंडीपिल्ली बाहेर येतात

अनेकदा सोशल मीडियाचाही वापर चांगल्या पद्धतीने होत नाही. व्हॉट्सपवरुन काहीतरी मेसेज करायचे. चुकीचं काहीतरी पाठवायचं. आमचे नेते म्हणजे देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार पदावर बसले आहेत. त्यामुळे आता मला कोण काय बोलणार आहे? या गैरसमजात राहू नका. मेसेज डिलिट केला तरीही सगळे मेसेज मिळतात. अशा गोष्टी केल्या आणि अडकलात तर मी सोडवायला येणार नाही. काही लोकांना तर मी मकोका लावायला सांगितला आहे. डिलीट केलेले ते सर्व फोटो, मेसेज रिकव्हर होतात. ग्रामीण भागात सर्वांची अंडीपिल्ली बाहेर येतात. मी फार पोहोचलेलो आहे, असे विचार मनात आणू नका, असेही त्यांनी सांगितले. तसेच मी कुणाचीही दादागिरी खपवून घेणार नाही हे लक्षात ठेवा, असाही इशारा अजित पवारांनी दिला.

## ते कंत्राटदार ब्लॅकलिस्ट करणार

मी बीड जिल्ह्यात विविध विकासकामांना निधी देणार आहे. पण स्कॉड पाठवून या कामांची पाहणी केली जाईल आणि चुकीचं काम करणाऱ्या कंत्राटदारांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकलं जाईल. तसंच पदाधिकाऱ्यांनी पत्र दिलं तरी विकासकामांसाठी १० लाखांचा निधी मिळणार नाही. ई टेंडर निघावं यासाठी १५ लाखाचे टेंडर काढणार, असंही यावेळी अजित पवारांनी सांगितलं आहे.




# संसदेने कायदा केला, तो सर्वांना मान्य करावाच लागेल; वक्फ विधेयकावरुन अमित शाहा कडाडले

नवी दिल्ली । वृत्तसेवा

केंद्र सरकारने आपले बहुचर्चित वक्फ सुधारणा विधेयक २०२५ संसदेत सादर केले. या विधेयकाचा इंडिया आघाडीकडून तीव्र विरोध केला जातोय, तर एनडीएतील सर्व पक्षांनी याला पाठिंबा दिला आहे. दरम्यान, आज विधेयकाच्या चर्चेदरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा यांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. यावेळी त्यांनी काँग्रेसवर मुस्लिमांची दिशाभूल करण्याचा आरोप केला.

अमित शाहा म्हणाले, गैर-मुस्लिमांना धार्मिक कार्यासाठी कामावर घेतले जात नाही. ते फक्त त्यांची व्होट बँक सुरक्षित करण्यासाठी लोकांना घाबरवण्याचा आणि गोंधळात टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. काँग्रेसने २०१३ मध्ये या कायद्यात बदल केला नसता, तर आज आम्हाला ही दुरुस्ती करण्याची गरजच पडली नसती. १९१३ पासून २०१३ पर्यंत वक्फकडे १८ लाख एकर जमीन होती, पण २०१३ च्या दुरुस्तीनंतर वक्फकडे २१ लाख एकर जमीन गेली. या जमिनीतील बहुतांश जमिनी वक्फने



विकल्या आणि यात प्रचंड भ्रष्टाचार झाला. काँग्रेस सरकारने दिल्ली ल्युटियन्सच्या १२५ मालमत्ताही वक्फला दिल्या, असाही आरोप शाहांनी केला.

**कायदा मान्य करावा लागेल**

हिमाचलमध्ये वक्फ जमीन घोषित करून मशीद बांधल्या गेल्याचा दावा शाहांनी केला. तसेच, तामिळनाडूपासून कर्नाटकपर्यंतची अनेक उदाहरणे दिली, ज्यात वक्फने वक्फने मालमत्ता आपल्या ताब्यात घेतली. शाहा पुढे म्हणाले, येथे एका सदस्याने म्हटले की, अल्पसंख्याक समुदाय हा कायदा

पान दोन वर

**दान आपल्या मालमत्तेचं करता येतं, सरकारी मालमत्तेचं नाही....**

लोकसभेत बोलताना अमित शाह म्हणाले, दान आपल्या संपत्तीचे केले जाऊ शकते. सरकारी जमिनींचे नाही. ते म्हणाले वक्फ एक प्रकारचे चॅरिटेबल एंडोरमेंट आहे. यात व्यक्ती पवित्र दान करते. दान अशाच गोष्टीचे केले जाते जी आपली आहे. सरकारी मालमत्ता अथवा इतर कुणाच्या मालमत्तेचे दान करता येत नाही. ही संपूर्ण चर्चा याच मुद्द्यावर आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयावर महिलांचा हंडा मोर्चा



बीड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील पाचीपिंपळ तांडा व इतर ठिकाणी पाण्याची टंचाई आहे. प्रशासन पातळीवर पाणीपुरवठा करण्यासाठी कुठलीही भूमिका घेतली जात नसल्याने दि.२ रोजी येथील महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर जनआक्रोश हंडामोर्चा काढला. या मोर्चामध्ये तांड्यावरील महिला व नागरिकांची उपस्थिती होती.

सध्या तिव्र उन्हाळ्याचे दिवस आहेत. अनेक ठिकाणी पाणीटंचाईच्या झळा सहन कराव्या लागत आहेत. धारूर तालुक्यातील रूईधारूर, पाचीपिंपळ तांडा, विझीरातांडा, घोड्याचा माळे तांडा या ठिकाणी पाणी नाही. पाण्यासाठी नागरिकांचे हाल होत असल्याने नागरिकांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयावर हंडा मोर्चा काढला. या मोर्चामध्ये महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आपल्या मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे.

# कर्ज बाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

गेवराई । प्रतिनिधी

कर्जमाफीची आशा मावळ्याने एका तरुण शेतक-याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना (दि.१) रोजी रात्री घडली. आकाश श्रीराम रोडगे(वय ३६)रा.रांजणी ता.गेवराई जि.बीड असे आत्महत्या केलेल्या तरुण शेतक-याचे नाव आहे.सदरील शेतक-याने बॅक ऑफ महाराष्ट्राचे पत्नी वैशाली रोडगे यांच्या नावे ७० हजार रुपयाचे कर्ज घेतले होते.

कर्ज भरणा करण्यासाठी बॅंकेकडून तगादा लावल्याने सद्यपरिस्थितीत पैसे नसल्याने शेतकरी आकाश रोडगे हे मागील आठवड्यापासून चिंतेत होते.त्यातच कर्ज माफीची आशा मावळल्याने कर्ज फेडायचे कसे या विवंचनेत असलेल्या आकाश याने मंगळवारी रात्री कुटुंबीयातील सर्व सदस्य गाढ झोपेत असताना घरातील आडुला गळफास घेऊन आत्महत्या केली. कुटुंबीयाना याची माहीती होताच गेवराई पोलीसांना माहीती दिली.यावरून पोलीस घटनास्थळावर दाखल होऊन मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी गेवराईच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केला.

दि.२ रोजी सकाळी शवविच्छेदन केल्यानंतर मृत शेतकरी यांच्यावर रांजणीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात वडिल, पत्नी, एक मुलगा,एक मुलगी असा परिवार आहे.

## ‘वक्फ’ने बळकावलेल्या हिंदू शेतकरी आणि देवस्थानच्या जमिनी राज्य सरकार परत करणार

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभेत वक्फ दुरूस्ती विधेयक मांडल्यानंतर महाराष्ट्रात मोठा निर्णय घेण्यात आला आहे. संसदेत वक्फ दुरूस्ती विधेयक मंजूर झाल्यानंतर, त्यातील तरतूदी पाहून वक्फ बोर्डाने बेकायदेशीरपणे बळकावलेल्या किंवा अतिक्रमण केलेल्या हिंदू शेतकरी आणि देवस्थानच्या जमिनी, तसेच काही मुस्लिम जनतेच्या जमिनी परत करू, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर



बावनकुळे यांनी केली.

**वक्फ दुरूस्ती विधेयक लोकसभेत सादर**

संसदीय कामकाज मंत्री किरेन

पान दोन वर

# विमानतळ, रेल्वे तसेच महत्वाच्या प्रलंबित कामांना गती देणार-उपमुख्यमंत्री अजित पवार

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला विविध विकासकामांचा आढावा; विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयातील विमानतळ, रेल्वे कामाची सद्यस्थिती, राष्ट्रीय महामार्ग, जिल्हा परिषदे अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना, शिक्षण विभागाचे नवोपक्रम, इनक्यूबेशन सेंटर तसेच तारांगण, विद्युत वितरण, जिल्हयात सुरू असलेल्या विविध विकास कामांचा आज उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आढावा घेतला. बीड जिल्हयांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी व सर्व मिळून काम करू, विमानतळ, रेल्वे तसेच महत्वाच्या प्रलंबित कामांना गती देण्यासोबतच विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात

पान दोन वर




## कालबद्ध निधी विनियोग

यंदाच्या आर्थिक वर्षात नियोजनपूर्ण निधी विनियोग करण्याचे संकेत पवार यांनी दिले. लवकरच याबाबत बैठक घेऊन नियोजन निधीतील सर्व बाबी व यंत्रणा यांचा आढावा घेण्यात येणार असून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता गतिमान पध्दतीने प्रदान करत डिसेंबर २०२५ पूर्वी निधी खर्च होईल तसेच काम दर्जेदार होईल, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

## मराठवाड्यातील पहिले कौशल्यवर्धन केंद्र

शहराच्या मध्यवर्ती भागात आय. टी. आय. च्या तीन एकर परिसरात कौशल्यवर्धन केंद्र उभारण्यात येणार आहे. टाटाच्या सहकार्याने हे केंद्र आकारास येईल. कंपनीतर्फे १६५.१० कोटी आणि एमआयडीसी कडून ३१.११ कोटी असे एकूण १९६.९८ कोटी खर्च करून याची उभारणी करण्यात येणार आहे. मराठवाड्यातील हे पहिले कौशल्यवर्धन केंद्र ठरणार आहे. याआधी विदर्भात चंद्रपूर आणि गडचिरोली व कोकणात रत्नागिरीत अशा केंद्राच्या कामाला सुरुवात झाली आहे.

## विमानतळ गतीने पुर्ण करणार

विमानतळासाठी आवश्यक जागा बीड शहरापासून १४ किमी अंतरावर असलेल्या कामखेडा नजीक निश्चित करण्यात आली आहे. रेल्वे तसेच विमानतळ सेवा गतीने पुर्ण करण्यात येईल, विमातळाबाबतच्या भूसंपादनाची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत या कामासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

## आकर्षक असेल तारांगण

एक उत्तम आणि अद्ययावत तारांगण उभारण्यात येणार आहे. यामध्ये सर्व जिल्हाभरातील शाळकरी मुलांना सहलीच्या माध्यमातून माहिती मिळावी हा या उभारणीचा हेतू आहे. बीड शहरात येणाऱ्या प्रत्येकासाठी एक उत्तम पर्यटन स्थळ देखील या तारांगणाच्या रूपाने उभे राहणार आहे. येथील आयटीआयच्या मोकळ्या जागेत २० कोटी रूपयांचा निधीतून तारांगण उभारण्याची योजना आहे. विद्यार्थ्यांनी बनविलेल्या विविध कलाकृती आणि जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळांच्या प्रतिकृती ठेवण्याचे नियोजन आहे.

संचार

## दक्षता घेतली पाहिजे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची थट्टा करणे स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याला अडचणीचे ठरलेले दिसते. शिंदे समर्थकांच्या रोषाचा सामना मात्र मुंबईतील हॅबिटॅट स्टुडिओला करावा लागला. कामराने एका मोठ्या नेत्याची खिल्ली उडवण्याचा प्रयत्न केला आहे. त्या अनुषंगाने पुन्हा एकदा मत मांडण्याचे स्वातंत्र्य आणि लोकशाही आदी मुद्दे चर्चेला आले आहेत व त्याची चर्चा होतच राहील. या पलीकडे जाऊन आणखी एक विषय आता चर्चेला येणे आवश्यक आहे की कॉमेडी करणार्यांनी लक्ष्मणरेषा ओलांडावी का? त्यांना वैगुण्यावर बोट ठेवण्याचा अधिकार निश्चितच दिला आहे व त्याचा ज्याच्यात धाडस असेल त्यांनी वापर केलाही पाहिजे. मात्र, असे व्यक्तिगत हल्ले करण्यामागे कोणता अंतःस्थ हेतू आहे का? चित्रपटातील गाजलेल्या गाण्याचे विडंबन कामराने सादर केले. त्याने एकनाथ शिंदे यांचे नाव घेतले नसले, तरी रोख त्यांच्याकडेच होता. शिवसेनेत फूट पडल्यानंतर शिंदे यांच्या गटावर मूळ पक्षातील नेत्यांकडून ज्या शब्दांचा वापर करत गेले दोन–तीन वर्षे हल्ला केला जातो आहे त्या शब्दांचा वापरही केला गेला व त्यामुळे शिंदेंच्या समर्थकांनी भडकणे स्वाभाविक होते. तोडफोड झाली, महापालिकेकडून कारवाईही झाली. स्टुडिओनेही कामराच्या व्हिडिओतील विचारांचे आम्ही समर्थन करत नाही, असे नमूद करत बिनशर्त आणि मनापासून माफी मागितली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री, दुसरे उपमुख्यमंत्री यांनीही कामराचा निषेध केला असून माफी मागावी असे त्याला सुनावले आहे, तर शिंदेंनी ज्या पक्षाला भगदाड पाडून आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले होते त्या मूळ पक्षाच्या प्रमुख मंडळींनी उघडपणे कामराचे समर्थन केले आहे. हा वाद इतक्यात थांबणार नाही. कामरा यानेही अगोदर न्यायालयाने आदेश दिले, तर माफी मागू असे म्हटले होते. नंतर त्याने पुन्हा घुमजाव केल्याचे समजते. याचा अर्थ त्याला आता भय नसल्याचे त्याने सूचित केले आहे. त्यामुळेच याला कोणी सुपारी दिली का किंवा कसला लाभ दिला गेला आहे का या चर्चांनाही जोर आला आहे. त्याचा त्याने इन्कार केला आहे.

नवमाध्यमांना मात्र स्वातंत्र्य आणि जबाबदारी यातील लक्ष्मणरेषा ओळखावी लागेल. देशात सगळीकडे ठराविक काळानंतर अशा घटना घडत आहेत. कोणीतरी कलाकार किंवा विद्वान त्याच्या अंगभूत गुणांमुळे असे वातावरण तापवतो. बऱ्याचदा यात मुख्य प्रवाहातील माध्यमे अर्थात प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया यांचा असल्या एककल्ली किंवा एकलक्ष्यी पेटवापेटवीत सहभाग नसतो. या माध्यमांची आणि त्यात काम करणाऱ्याची काही धोरणे असतात आणि त्यांना आचारसंहिता असते. कुठला विषय आक्रमक स्वरूपात मांडणे आवश्यक आहे आणि कुठल्या विषयावर फार चर्चा होणे अहितकारी आहे याचे त्यांना भान असते. एरव्ही त्यांची टीका प्रामुख्याने व्यवस्थेवर, धोरणांवर आणि विचारांवर असते. नवमाध्यमांना असले बंधन नाही. त्याचे कारण ही माध्यमे चालवणारे किंवा हाताळणारे हे त्या माध्यमातील पहिली पिढी असते. कोणाकडून त्यांना वारसा परंपरेने किंवा गुरूशिष्य परंपरेने ते माध्यम मिळालेले नसते. त्यामुळे माध्यम हाती आले आणि त्यात प्रशंसा करणाऱ्याचा आणि आपल्यापेक्षाही आपल्या म्हणण्याला अधिक आक्रमक शब्दांत समर्थन करणाऱ्याचा गट याच माध्यमाच्या माध्यमातून मिळत गेला की मग तोल सुटत जातो. आपण जे काही मांडले ते राज्यातील किंवा देशातील कथित वास्तव आहे असे जरी या एकाकी टिकाकारांना किंवा असलेच तर त्यांच्या मागच्या अदृश्य हातांना वाटत असले तरी आणि प्रसंगी त्यांची टीका योग्य किंवा अयोग्य असली तरी त्यांना न्यायाधीशांची भूमिका कोणी बहाल केलेली नाही व तशी त्यांनी ती स्वत:हून स्वीकारूही नये. चुकांकडे दुर्लक्ष करावे असे कोणी म्हणणार नाही. मात्र, जेव्हा एखाद्या माध्यमाचा वापर जर शस्त्र म्हणून करणार असू तर त्याचा घातकपणा किती आहे व ते आपल्यावरच उलटणार नाही ना किमान याचीही दक्षता घेतली पाहिजे.

# वाढती वाहनसंख्या : भविष्यातील संकटाची नांदी !




जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : [redacted]

आपल्याही दारात आपली स्वतःची गाडी असावी असे प्रत्येक व्यावहारिक माणसाचे स्वप्न असते. हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी अनेकांना मुहूर्त सापडतो तो गुढीपाडवा, दसरा किंवा दिवाळीचा. या तीन सणांना गाड्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी आणि विक्री होती. यंदा गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर राज्यात ८६ हजार ८१४ वाहन खरेदीची नोंद झाल्याचे वृत्त नुकतेच वाचनात आले. वाहन खरेदीचे हे प्रमाण मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा तब्बल ३० टक्यांनी वाढले आहे. या वाहन खरेदीमध्ये अर्थातच शहरवासीय आघाडीवर आहेत. पुणे, मुंबई, नाशिक आणि ठाणे शहर पहिल्या पाचांत आहेत. शहरांत पूर्वी सर्वच गाड्या पेट्रोल डिझेलवर चालणाऱ्या असत, त्यानंतर सीएनजीचा पर्याय आला. इंधनखर्च वाचावा म्हणून लोकांनी आपल्या जुन्या गाड्या विकून सीएनजीवर चालणाऱ्या गाड्या खरेदी केल्या आता विजेवर म्हणजेच बॅटरीवर चालणाऱ्या गाड्या बाजारात येऊ लागल्या आहेत त्यामुळे लोकांकडून या गाड्यांना अधिक पसंती मिळू लागली आहे. टॅक्सी रिक्षा यांच्याप्रमाणे खासगी वाहनांच्या खरेदी विक्रीवर कोणतेच बंधन नसल्याने शहरातील वाढती वाहनसंख्या डोकेदुखी ठरू लागली आहे.

मुंबईतील वाढत जाणारी वाहनांची संख्या विचारात घेता भविष्यात मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागण्याची दाट शक्यता आहे. लोकसंख्येच्या भस्मासुराने मुंबईला आधीच गिळंकृत केले आहे. याचा भार लोकलगाड्या, बसगाड्या, टॅक्सी आणि रिक्शा यांवर पडत आहे. यांवर पर्याय म्हणून सुरु केलेली मोनो आणि मेट्रो रेल्वेही कमी पडू लागल्या आहेत. आजमितीला मुंबईकरांचे राहणीमान उंचावल्याने आणि लोकल अन् बस गाड्यांतील जीवघेणी गर्दी नकोशी वाटू लागल्याने सर्वसामान्य मुंबईकरही स्वत:च्या मालकीचे वाहन घेऊ लागला आहे. व्यवसायासाठी घेतल्या जाणार्या रिक्शा-टॅक्सींसह, 'ओला', 'उबेर' यांसारख्या वाहतूक आस्थापनांच्या माध्यमांतून व्यवसाय करण्यासाठी विकत घेण्यात येणार्या वाहनांचीही दरवर्षी यांमध्ये भर पडत आहे. वाढत जाणार्या वाहनांच्या तुलनेत मुंबईतील रस्त्यांची संख्या आणि आकारमान मर्यादित आहे. मुंबईतील इंच इंच जागेला सोन्याचा दर असल्याने गाड्या उभ्या करण्यासाठी मोकळ्या जागाही कमी पडत आहेत. रस्त्यांवर उभ्या केल्या जाणाऱ्या गाड्या वाहतुकीला अडथळा ठरत आहेत. त्यामुळे वाढत्या वाहनसंख्येवर नियंत्रण आणण्याची आज नितांत गरज निर्माण झाली आहे. दर वर्षी मुंबईतील वाहनांच्या संख्येत दोन ते तीन लाख वाहनांची भर पडते. पेट्रोल, डिझेल आणि गॅसचे दर वाढले असले तरी मुंबईकरांच्या हौसेपुढे ते नगण्य आहेत असेच म्हणावे लागेल. सद्यस्थितीत राज्यभरातील एकूण वाहनांपैकी १० टक्क्यांहून अधिक वाहने इवल्याशा मुंबईच्या रस्त्यांवरून फिरतात. मुंबईतील रस्त्यांची एकूण लांबी सुमारे १९०० किलोमीटर आहे. एकूण वाहनांची संख्या पहाता प्रति किलोमीटरमागे मुंबईत २३६८ वाहने आहेत. 'मुंबईतील सर्व वाहने एकाच दिवशी रस्त्यावर आली, तर रस्त्यावरून चालण्याकरिता जागाच शिल्लक रहाणार नाही.' असे मत वाहतूकतज्ञांनीही व्यक्त केले आहे. या आकडेवारीतूनच भविष्यात मुंबईचे काय होणार याचा अंदाज येतो.

मुंबईतील वाढत जाणारी वाहनसंख्या वायू आणि ध्वनी प्रदूषणात मोठ्या प्रमाणात भर घालत आहे. परिणामी नागरिकांना विशेषतः लहान मुलांना आणि वयस्कांना श्वसनाचे आणि फुप्फुसांचे विकार जडत आहेत. मुंबईत चालू असलेले मेट्रो-मोनो रेल्वे प्रकल्प, तसेच विविध कामांसाठी रस्त्यांत नियमितपणे होणारे खोदकाम या सर्वांचा परिणाम वाहतुकीच्या गतीवर होत असतो. त्यामुळे शहरातील सिग्नल यंत्रणेवर वर्दळीच्या वेळेत मोठ्या प्रमाणात ताण येतो. यांवर पर्याय म्हणून सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळेत अवजड वाहनांना मुंबईत प्रवेशबंदी करण्यात आली होती; मात्र त्याचाही विशेष लाभ झाला नाही. जीएसटी आल्यानंतर ऑक्ट्रॉय नाकेही बंद झाल्याने मुंबईत येणाऱ्या वाहनांची संख्या आणखी वाढली आहे. वाहनसंख्येच्या क्रमवारीत मुंबईच्या पुढे असलेल्या देहली शहरात एक दिवस सम क्रमांक असलेली आणि एक दिवस विषम क्रमांक असलेली वाहने चालवण्याचा पर्याय शोधण्यात आला होता; मात्र याचा भार सार्वजनिक वाहतूक यंत्रणेवर पडत असल्याने मुंबई शहरात हा पर्यायसुद्धा उपयोगाचा नाही. मुंबईप्रमाणे नवी मुंबई, ठाणे, पुणे या प्रगतशील शहरांतही काहीशी अशीच परिस्थिती आहे. वाहनसंख्येची समस्या लवकरच रौद्र रूप धारण करू शकते. यासाठी राज्य प्रशासनाने चिंतन करून वाहनसंख्येवर नियंत्रण आणण्याचे आणि या भीषण समस्येविषयी लोकजागृती करण्याचे उपाय लवकरात लवकर शोधले पाहिजेत.

# एक रुपयात पीक विमा योजना बंद होणार!

## शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन चुनावी जुमला आहे का?

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य शासनाने एक रुपयात पीक विमा योजना गुंडाळण्याचा निर्णय घेतला असून, यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली २० मार्च रोजी झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली. त्यानंतर २६ मार्च २०२५ रोजी राज्याच्या कृषी विभागाने कृषी आयुक्तांना स्पष्ट निर्देश दिले आहेत की, २०२५ च्या खरीप हंगामापासून नवीन पीक विमा योजना राबवली जाणार आहे. मग एक रुपयात पीक विमा, हे शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन चुनावी जुमला आहे का ? असा सवाल विमा अभ्यासक अनिल जगताप यांनी केला आहे.

महायुती सरकारने सत्तेत येण्यापूर्वी एक रुपयात पीक विमा योजना हे मोठे आश्वासन दिले होते. मात्र, हे आश्वासन आता केवळ जुमलाच ठरले आहे. याआधी 'लाडकी बहीण' योजनेसह अनेक आश्वासने पाळली गेली नाहीत. त्याच धर्तीवर एक रुपयात पीक विमा योजना गुंडाळण्यात आली असून, शेतकऱ्यांच्या कोपराला गूळ लावल्याची भावना बळीराजामध्ये निर्माण झाली आहे.

सन २०२३ पासून राज्यात एक रुपयात पीक विमा योजना राबवण्यात आली. मात्र, योजनेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे उघड झाले आहे. सामूहिक सुविधा केंद्र (सीएससी) चालकांनी बनावट अर्ज दाखल करून अपात्र व्यक्तींना विम्याचा लाभ दिला. याशिवाय शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पिकांच्या ऐवजी जास्त विमा रक्कम मिळवण्यासाठी अन्य पिकांची माहिती दर्शवली. शासकीय जमिनी, मंदिरांच्या जमिनी आणि अकृषिक जमिनींवरही विमा काढल्याचे प्रकार समोर आले.



**शेतकऱ्यांच्या तक्रारी आणि विमा कंपन्यांचा फायदा**

२०१६ ते २०२४ या आठ वर्षांत राज्य शासनाने पीक विमा योजनेसाठी ४३२०१ कोटी रुपये विमा कंपन्यांना दिले. परंतु शेतकऱ्यांना केवळ ३२ हजार ६५८ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मिळाली. परिणामी, विमा कंपन्यांनी तब्बल १० हजार ५४३ कोटी रुपये नफा मिळवला. याशिवाय, विमा कंपन्यांच्या कार्यपद्धतीबाबत शेतकऱ्यांच्या अनेक तक्रारी असल्याचेही बैठकीत स्पष्ट झाले.

**इतर राज्यांचे मॉडेल आणि महाराष्ट्राचा पुढील मार्ग**

गुजरातने पीक विमा योजनेतून बाहेर पडून थेट पावसाच्या प्रमाणावर आधारित मदत योजना राबवली आहे. ओडिशामध्ये एक रुपयात पीक विमा केवळ दोन हेक्टरपर्यंतच लागू आहे. आंध्र प्रदेशमध्ये राज्य सरकार १०० टक्के पीक पाहणी करून विमा हप्ता भरते. याउलट, राजस्थानमध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्तींसाठी विमा संरक्षण नाही. महाराष्ट्र राज्याने यापुढे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, खरीप, रब्बी आणि नगदी पिकांसाठी अनुक्रमे २ टक्के, १.५ टक्के आणि ५ टक्के विमा हप्ता लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

**योजना बंद करणे योग्य नाही**

गैरव्यवहार रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात, परंतु योजना बंद करणे योग्य नाही. शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षितता मिळण्यासाठी ही योजना सुरूच ठेवली पाहिजे. सरकारने पीक विमा नुकसानभरपाईच्या प्रक्रियेत सुधारणा करावी. अन्यथा शेतकऱ्यांच्या मनात ही योजना केवळ निवडणुकीसाठी होती, अशी भावना निर्माण होईल, असे विमा अभ्यासक अनिल जगताप यांनी सांगितले.

पान १ वरून

## संसदेने कायदा केला, तो सर्वांना मान्य

स्वीकारणार नाही. हा संसदेचा कायदा आहे आणि सर्वांना तो स्वीकारावाच लागेल. कोणत्याही सदस्य अल्पसंख्याक समुदाय हा कायदा मान्य करणार नाही, असे कसे म्हणू शकतो? हा कायदा भारत सरकारचा कायदा आहे आणि तो स्वीकारावा लागेल, असेही शाहांनी ठणकावून सांगितले.

**वक्फची चौकशी व्हायला हवी**

अमित शाहा पुढे म्हणतात, वक्फमध्ये एकही गैर-इस्लामी सदस्य असणार नाही. लेखापरीक्षणात पारदर्शकता येईल. जिथे वक्फ घोषित केला जाईल, ती जमीन सरकारी आहे की नाही, याची पडताळणी व्हायला हवी आणि जिल्हाधिकाऱ्यांशिवाय कोणीही त्याची पडताळणी करू शकत नाही. दान स्वतःच्या मालकीच्या जमीनीचे करायचे असते, इतरांच्या किंवा सरकारी मालकीच्या जमिनीचे नाही. विरोधकांकडून वक्फ दुरुस्ती विधेयकाबाबत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातोय.

**जमिनींना सुरक्षा मिळणार...**

या विधेयकामुळे जमिनींना सुरक्षा मिळणार आहे. एखाद्याच्या जमिनीची केवळ घोषणा करून ती वक्फ मालमत्ता होणार नाही. पुरातत्व विभाग, आदिवासी बांधवांच्या जमिनी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जमिनी सुरक्षित राहतील. वक्फ मालमत्ता घोषित करण्याचा अधिकार रद्द करण्यात आला आहे, ते जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रमाणित करावे लागेल, असेही अमित शाहांनी यावेळी स्पष्ट केले.

मी या विधेयकाच्या बाजूने बोलत आहे. मला वाटते, एक तर निर्दोष भावनेने अथवा राजकीय कारणांमुळे सदस्यांच्या मनात अनेक गैरसमज आहेत आणि ते पसरवण्याचे कामही सुरू आहे. मी काही गोष्टरी स्पष्ट करण्याचा प्रयत्न करेन. वक्फ एक अरबी शब्द आहे. याचा इतिहास काही हदीसशी संबंधित सापडतो. आज ज्या अर्थाने वक्फ शब्दाचा वापर केला जातो, त्याचा अर्थ आहे अल्लाहच्या नावावर मालमत्तेचे दान. आम्ही आज जो अर्थ समजत आहोत, तो इस्लाम चे दुसरे खलीफा उमर यांच्या काळात अस्तित्वात आला.

शाह काँग्रेसवर थेट हल्ला करताना म्हणाले, वक्फ विदेयकावर २०१३ मध्ये जे संशोधन आले, ते आले नसते, तर आज हे संशोधन आणण्याची गरज पडली नसती. त्यावेळी काँग्रेस सरकारने दिल्लीतील १२५ लुटियन्स मालमत्ता वक्फला दिल्या. उत्तर रेल्वेची जमीन वक्फला देण्यात आली. हिमाचलमध्ये वक्फ जमीन असल्याचा दावा करून एक मशीद बांधण्यात आली. यावेळी शाह यांनी, तामिळनाडूपासून कर्नाटकपर्यंतची काही उदाहरणे दिली ज्यावर विरोधकांनी गदारोळ केला आणि त्यांच्यावर सभागृहाची दिशाभूल केल्याचा आरोप केला.

## विमानतळ, रेल्वे तसेच महत्वाच्या

आज उपमुख्यमंत्री पवार यांनी आढावा घेतला.

यावेळी पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, सर्वश्री आमदार सतिष चव्हाण, विक्रम काळे, प्रकाश सोळंके, सुरेश धस, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडीत, उपमुख्यमंत्री यांचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अदित्य जीवने यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

बीड जिल्हयांच्या सर्वांगिण विकासासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन व आपण सर्व नागरिक यांचा समन्वय महत्त्वाचा आहे. राज्य शासनाकडून जिल्हयातील विकासकामासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. अशी ग्वाही देतानाचा त्यांनी सांगितले की, अनेक वर्षापासून रेल्वेमार्गाच्या सुरू असलेल्या कामाला गती देण्यात येईल. विभागीय आयुक्त बीड रेल्वेबाबत दर महिन्याला आढावा घेतील. रेल्वे मार्गाच्या कामात कोणी अडथळा आणत असेल तर त्यांची गय केली जाणार नाही, अशा प्रकरणी थेट सरकारी कामात अडथळा आणल्याबाबतचे गुन्हे नोंदविण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

आष्टी येथील वीज उपकेंद्राच्या कामाला गती देण्याचे निर्देश देत उपमुयमंत्री पवार म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशात २ कोटी घरकुल देण्याची योजना आहे, त्यात राज्यात २० लाख घरकुल देण्यात येणार आहेत, बीड जिल्हयात सद्यस्थितीत ८५ हजार घरकुलाचे काम सुरू आहे, येत्या कालावधीत ७५ हजार घरकुले पुर्ण करण्याचे उदिष्ट ठेवून काम करूया. दिवाळी नव्या घरकुलात या उपक्रमाची सुरूवात श्री. पवार यांच्या हस्ते करण्यात आली. शासकीय निधीची वाट न पाहता घरकूल उभारणाऱ्या १० कुटुंबाचा यावेळी पवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

शालेय विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषदेच्या वतीने राबविण्यात आलेल्या पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान गुणवत्ता विकास अभियान २०२५ या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. या उपक्रमातून शालेय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास साधला जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या शैक्षणिक सुधारणांतून भावी पिढी चांगली तयार व्हावी, या हेतूने संपूर्ण जिल्हयात हा उपक्रम राबविण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून आवश्यक निधी देण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने शिक्षक वर्गासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण मिळावे यासाठी ३० लाख रूपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. यात गरज भासल्यास सीएसआर तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून निधी देण्याचीही आपली तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले. शालेय परिसर संरक्षक भिंत, शौचालय, अंगणवाडी तसेच शैक्षणिक विकासाला सर्वाच्च प्राधान्य देण्यात येणार असल्याचेही असल्याचे पवार म्हणाले.

जिल्हयातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेत उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, आपल्या जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था चांगली यासाठी पोलीस प्रशासनासोबतच आपल्या प्रत्येकाची ती जबाबदारी आहे. पोलीस प्रशासनाला आवश्यक असलेला निधी तातडीने देण्यात येईल. पायाभूत सुविधा, वाहने तसेच पोलीस स्टेशनमध्ये आवश्यक त्या बाबींची तातडीची गरज पुर्ण करण्यासाठी १६ कोटी ३४ लाख रूपयांचा निधी देण्यात येत असल्याचेही श्री. पवार म्हणाले. जिल्हयात यापुर्वी देण्यात आलेल्या शस्त्र परवान्याचीही पुन्हा पडताळणी करण्यात यावी. गरज तपासूनच शस्त्र परवाना देण्यात यावा,असे निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले.

अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला येत्या वर्षात ५० वर्ष पुर्ण होत असल्याचे निमित्त साधून महत्त्वाच्या कामासाठी आवश्यक निधी शासन स्तरावरून देण्यात येईल. बीड सह लगत असलेल्या परभणी, लातूर व धाराशिव या चार जिल्हयातील रुग्णांची संख्या पाहता सर्व सुविधाही देण्यासाठी निधीची तरतूद करण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी यावेळी जिल्हा प्रशासनाच्या वतीने नव्याने उभारण्यात येत असलेल्या विमानतळ, रेल्वे मार्गाची स्थिती तसेच सुरू असलेल्या विविध विकास कामांबाबत सादरीकरण केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अदित्य जीवने, जिल्हा पोलीस अधीक्षक नववीन काँवत यांनीही आपल्या विभागाच्या वतीने सुरू असलेल्या कामाबाबत माहिती दिली.

यावेळी विविध यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## 'वक्फ'ने बळकावलेल्या हिंदू शेतकरी आणि

रिजिजू यांनी आज (दि. २) लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयक मांडले. वक्फ विधेयकाद्वारे सरकार कोणत्याही धर्माच्या बाबींमध्ये हस्तक्षेप करणार नाही. हे विधेयक केवळ मालमत्तेच्या व्यवस्थापनाशी संबंधित आहे. मंदिर, मशीद किंवा कोणत्याही धार्मिक स्थळाच्या व्यवस्थापनाशी त्याचा काहीही संबंध नाही, असे मंत्री किरेन रिजिजू यांनी विधेयक मांडल्यानंतर लोकसभेत आपल्या भाषणात स्पष्ट केले.

# पेरणीपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या, ट्रिपल इंजिनमध्ये पत असेल तर केंद्राकडून राज्याला विशेष पॅकेज आणा-हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार व लाडकी बहिणींना १५०० रुपयांवरून २१०० रुपये देण्याचे जाहीर आश्वासन महायुतीने दिले होते. पण आता त्यांची भाषा बदलली असून ३१ मार्चपूर्वी कर्ज भरण्याचे फर्मान काढले जाते हा प्रकार राज्यातील महायुतीच्या नेत्यांचा गजनी झाल्याचा प्रकार आहे पण पेरणीपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली पाहिजे. ट्रिपल इंजिनमध्ये पत असेल तर त्यांनी केंद्र सरकार कडून विशेष पॅकेज आणावे, असे आव्हान महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, अर्थसंकल्पीय अधिवेशन कोणताही महत्वाचा निर्णय न घेताच गुंडाळले. मोठी मोठी भाषणे केली पण त्यांना त्यांच्याच जाहिरनाम्याचा विसर पडला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यात नटसम्राट शिरला होता पण 'राजा उदार झाला आणि हाती भोपाळा दिला', असे वर्णन अधिवेशनाचे करावे लागेल. जनतेचे मुलभूत प्रश्न सोडून औरंगजेबाची कबर उकरून काढण्यात आली. बेरोजगारी, शेतकरी कर्जमाफी, शेतमालाला भाव याचा विसर महायुती सरकारला पडला आहे. सरकारने जाणीवपूर्वक मुद्द्यांना बगल दिली.

खडकपूर्णा डाव्या कालव्याच्या पाण्यासाठी फडणवीस मुख्यमंत्री असताना स्थानिक आमदाराला



वाढदिवसाची भेट म्हणत त्यांनी सही करत सुप्रमा दिली होती पण आता ते होऊ शकत नाही अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. याच पाण्याच्या प्रश्नावरून तरुण शेतकरी कैलास नागरे यांनी आत्महत्या केली. त्यामुळे, क्या हुआ तेरा वादा? अशी विचारणा जनता करत आहे असेही सपकाळ म्हणाले.

वक्फ सुधारणा विधेयकवर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, संविधान सभेत नियम तयार होत असतानाच जमिनीचे काही विशेष अधिकार दिलेले आहेत. मंदिर, प्रार्थना स्थळे यांना जमिनी दिल्या आहेत, इनाम जमिनी देण्यात आल्या आहेत, महाराष्ट्रात छत्रपतींच्या वारसांनाही जमिनीचे विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत. देशात भूमिहिनांची संख्या जास्त होती, आचार्य विनोबा भावे यांनी भूदान चळवळ राबवून हजारो एकर जमिन जमा करून भूमिहिनांना दिली. पंडित नेहरु यांनी कसेल त्याची जमीन म्हणत कूळ कायदा आणला, नंतर सिलिंगचा कायदा आणला, इंदिरा गांधी यांनी जमिनीचे पट्टे देण्याचा निर्णय घेतला, तर युपीए सरकार असताना आदिवासींना वन जमिनीचा हक्क दिला परंतु भाजपा सरकार वक्फ विधेयकाकडे धार्मिक नजरेने पाहून ती जमीन ताब्यात घेऊन उद्योगपती व बिल्डरांच्या घशात घालण्याचा प्रयत्न करत आहे का? धारावीची जमीन अदानीच्या घशात घातली आहे. शक्तिपीठ मार्गाच्या नावाखाली कोकणपट्टा अदानी अंबानीला देण्याचा आट घातला जात आहे, तसाच हा प्रकार आहे असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

**नरेंद्र मोदींची खूर्ची डळमळीत!**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ वर्षानंतर ३० मार्च रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नागपूरमधील मुख्यालयाला भेट दिली. आपली खूर्ची धोक्यात आल्यामुळेच नरेंद्र मोदी यांना आरएसएसची आठवण आली असावी, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# नवी विकासकामे नकोत, तिजोरीत खडखडाट; आर्थिक भार सोसेना, राज्य सरकारने परिपत्रकच काढले

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याच्या तिजोरीवरील भार दिवसेंदिवस वाढत असल्याने आर्थिक परिस्थिती झपाट्याने खालावत चालली असल्याचे चित्र आहे; कारण सार्वजनिक बांधकाम विभागाला दरवर्षी प्राप्त होणाऱ्या निधीमधून पूर्वी मंजूर केलेल्या कामाची बिले अदा करणे शक्य होत नाही. त्यामुळे नव्याने मंजूर करण्यात येणाऱ्या कामांची संख्या मर्यादित ठेवण्याचे आदेश राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने आज एका परिपत्रकाद्वारे जारी केले आहेत. त्याचा सर्वात मोठा फटका नवीन रस्ते व पुलांच्या बांधकामांना बसणार आहे.



राज्यातील मोठी विकासकामे कंत्राटदारांमार्फत करण्यात येतात. राज्याच्या तिजोरीत निधी नसल्यामुळे या कंत्राटदारांनी ५४ हजार कोटी रुपयांची बिले थकली आहे. ३१ मार्च रोजी आर्थिक वर्ष संपताना सरकारने कंत्राटदारांचे फक्त ७४२ कोटी रुपये दिले आहे. थकीत बिलांची उर्वरित रक्कम कधी मिळणार याबाबत कोणताही सुस्पष्टता जारी केलेली नाही. त्यामुळे कंत्राटदारांनी १ एप्रिलपासून सर्व विकासकामे थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. आता ५ एप्रिल रोजी कंत्राटदार महासंघाची राज्यव्यापी बैठक होणार आहे. त्यामध्ये मोठा निर्णय घेतला जाणार आहे. त्यातच राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने आज परिपत्रक जारी करून नव्याने कामे मंजूर करू नयेत असे आदेश जारी केले आहेत.

**निधीपेक्षा जास्त कामांना मंजुरी**

सार्वजनिक बांधकाम विभागाला दरवर्षी नियतव्ययाच्या(निधी) जास्त प्रमाणात किमतीची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. त्यामुळे दरवर्षी प्राप्त होणाऱ्या नियतव्ययामधून या कामांची देयके अदा करणे अशक्य आहे. मंजूर कामांना वेळेत निधी प्राप्त न झाल्यास कामांच्या किमतीत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. त्यामुळे कामांच्या गुणवत्तेवर मोठ्या प्रमाणावर विपरीत परिणाम होत असल्याचे या परिपत्रकात म्हटले आहे.

**कामांची संख्या मर्यादित**

सार्वजिनिक बांधकाम विभागामार्फत नव्याने मंजूर करण्यात येणाऱ्या कामांबाबत धोरण आखून नव्याने मंजूर करण्यात येणाऱ्या कामांची संख्या मर्यादित ठेवणे आवश्यक आहे. नवीन रस्ते, पूल इतर कामे अर्थसंकल्पित करण्याच्या संदर्भात मार्गदर्शन सूचना जारी केल्या आहेत.

**अत्यावश्यक कामेच होणार**

राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्गावरील दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाच्या, जास्त वाहतूक वर्दळ असणाऱ्या व अत्यावश्यक सुधारणेची आवश्यकता असलेल्या रस्त्यांची कामे रस्ते योजनेच्या प्राधान्यक्रमास अधीन राहून प्रस्तावित करण्याचे निर्देश दिले आहेत.

**वरातीमागून घोडे**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या परिपत्रकावर महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. वरातीमागून घोडे अशा शब्दात त्यांनी वर्णन केले आहे. या जीआर म्हणजे आता सरकारला नवीन कामे मंजूर करायची नाहीत असे दिसते. मागील वर्षी प्रत्येक लोकप्रतिनिधीला ५०० कोटी रुपयांची कामे मंजूर करताना जाग आली नाही का? तेव्हा अर्थ विभाग झोपला होता का? राज्याच्या या बिकट परिस्थितीला हेच राज्यकर्ते जबाबदार असल्याचा आरोप त्यांनी केला. मागील कामांचे पैसे देणे होत नाही. मागील वर्षी मंजुरी मिळालेले व कार्यारंभ मिळालेल्या कामांना निधी मिळणार नाही. खरंच अवघड आहे, अशा शब्दांत मिलिंद भोसले यांनी संताप व्यक्त केला.

## दत्तात्रय गाडेच्या पुन्हा पोलीस कोठडीचा अर्ज न्यायालयाने फेटाळला

पुणे । प्रतिनिधी

स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे याची पुन्हा पोलीस कोठडी हवी असल्यामुळे गुन्हे शाखेने आरोपीच्या पोलिस कोठडीसाठी केलेला अर्ज गायगोले कोर्टाने बुधवारी फेटाळला. गाडेच्या अटकेची परवानगी न मिळाल्याने थ्रीडी इफेक्ट वापरून पोलिस तपास करण्यास काही अंशी अडथळा निर्माण झाला आहे. दरम्यान, गाडेला दि. २८ फेब्रुवारी अटक केल्यांनतर त्याला दि. १२ मार्चपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली होती. मात्र, पोलिसांनी अर्जात पुन्हा पोलीस कोठडी मिळण्याबाबत ठोस कारण दिले नसल्याने न्यायालयाने अर्ज फेटाळून लावला.

# बीडचे प्रकरण महत्त्वाचे, नेत्यांची विधाने नाहीत; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केले स्पष्ट

**मुंबई । प्रतिनिधी**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून सुरू झालेला भाजपा आमदार सुरेश धस विरुद्ध राष्ट्रवादीचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यातील राजकीय संघर्ष थांबता थांबत नसल्याचे चित्र आहे. आमदार सुरेश धस यांनी पुन्हा एकदा नाव न घेता धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. सुरेश धस यांनी केलेल्या विधानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रतिक्रिया विचारण्यात आली होती. याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली.

मला हरणाचे मांस खोक्याने पुरवले, असा आरोप करण्यात आला. आता माझ्यावर इतकी वाईट वेळ आली का? मूळात मी १६ वर्षे माळकरी राहिलो आहे. आता डॉक्टरांच्या सल्ल्याने मांसाहार करत असलो तरी हरणाचे मांस खाण्यापर्यंत मी अजून गेलो नाही. पण



इथे माझ्यावर हरणाचे मांस खाल्ल्याचा आरोप करून नंतर त्यांनी बाहेरच्या राज्यातून विमानाची तिकिटे काढून बिश्नोई समाजाची काही लोक आणले. याने हरणाचे मांस खाल्ले असे सांगून बिश्नोई समाजात मला व्हिलन करण्याचा त्यांचा प्लॅन होता आणि त्यातून लॉरेन्स बिश्नोईने माझी हत्या करावी, असा कट रचण्यात आला होता, असा खळबळजनक आरोप सुरेश धस यांनी केला होता. पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड प्रकरणावर स्पष्ट शब्दांत भाष्य केले.

**बीडचे प्रकरण महत्त्वाचे, नेत्यांची विधाने नाहीत**

अशा विधानांवर मी काही उत्तर देणार नाही. बीडमध्ये रोज नवीन विधाने केली जातात. पण माझ्याकरिता बीडचे प्रकरण महत्त्वाचे होते. त्यात सीआयडीने योग्य तपास केला. आरोपपत्र दाखल केले आहे. आरोपपत्रानुसार आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा मिळाली पाहिजे, याकडे आमचे लक्ष आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, माझ्या बाबतीत इतक्या खालच्या पातळीवर तुम्ही जात असाल तर तुमच्यासोबत मैत्री काय कामाची आहे? मला आयुष्यातून उठवण्यापर्यंत यांची मजल गेली आहे. या कटात कोण-कोण सामील होते, याची माहिती माझ्याकडे आहे. मी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना याबाबत माहिती देणार आहे, असे सुरेश धस यांनी म्हटले होते.

# वक्फ बोर्डच्या महाराष्ट्रात तब्बल ३७३३०.९७ हेक्टर मालमत्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात सध्या वक्फ बोर्डच्या तब्बल २३५६६ मालमत्ता आहेत. त्यात एकट्या मराठवाड्यात मालमत्तेच्या ६०% पेक्षा जास्त भागावर अतिक्रमण झाल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे याबाबत बोर्डाने ४२ आदेश पारित केले. मात्र, त्यातल्या एकाही मलामत्तेची पुनर्प्राप्ती झाली नसल्याचे समजते. देशभर गाजणाऱ्या वक्फ बोर्डाची महाराष्ट्रात काय स्थितीचा आढावा घेताना ही बाब निदर्षनास आली आहे.

वक्फ बोर्डाच्या महाराष्ट्रातील मालमत्तांचे एकूण क्षेत्रफळ हेक्टरमध्ये ३७३३०.९७ आहे. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर महसूल विभागामध्ये वक्फच्या १५८७७ मालमत्ता आहेत. त्याचे क्षेत्रफळ हेक्टरमध्ये २३१२१.१० आहे.

विदर्भातल्या नागपूर विभागात वक्फच्या ४७० मालमत्ता असून त्यांचे क्षेत्रफळ हेक्टरमध्ये ३७०४.२५ आहे. अमरावती महसूल विभागात वक्फच्या अमरावती १३१० मालमत्ता आहेत. त्याचे क्षेत्रफळ हेक्टरमध्ये ११०२ इतके भरते.

नाशिक महसूल विभागामध्ये वक्फच्या १४५५ मालमत्ता आहे. त्यांचे क्षेत्र ३३४० हेक्टर भरते. महसूलच्या पुणे विभागामध्ये वक्फच्या २७२८ मालमत्ता असून, त्यांचे क्षेत्रफळ हेक्टरमध्ये ३७२४.५५ आहे. कोकणातही वक्फची मालमत्ता आहे. या ठिकाणी १७२४ ठिकाणी मालमत्ता असून, त्यांचे क्षेत्रफळ २३३९ हेक्टर भरते.

**वक्फ बोर्ड म्हणजे नेमकं काय?**

'वक्फ' हा अरबी शब्द आहे. अल्लाह आणि इस्लामच्या नावावर धर्मादाय हेतूने दान केलेल्या संपत्तीला 'वक्फ' असं म्हणतात. स्थावर आणि जंगम दोन्ही मालमत्ता वफ्फच्या कार्यक्षेत्रात येतात. भारताच्या वक्फ मालमत्ता व्यवस्थापन प्रणालीमधील माहितीनुसार देशात एकूण ३० वक्फ बोर्ड आहेत.

जवाहरलाल नेहरू सरकारने १९५४ मध्ये 'वक्फ कायदा' केला. सन १९९५ मध्येही वक्फ कायद्यातही बदल करण्यात आले, त्यानंतर प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात वक्फ बोर्ड स्थापन करण्याची परवानगी देण्यात आली. या कायद्यात दाव्यापासून वक्फ मालमत्तेची देखभाल करण्यापर्यंत अनेक तरतुदी आहेत.

**वक्फ बोर्डाकडे ८ लाख एकरपेक्षा जास्त जमीन**

वक्फ बोर्डाकडे २००९ पर्यंत ४ लाख एकर जमीन होती, जी काही वर्षांमध्ये जवळपास दुप्पट झाली. २०२३ मध्ये अल्पसंख्याक मंत्रालयाने लोकसभेत सांगितले होते की डिसेंबर २०२२ पर्यंत वक्फ बोर्डाकडे एकूण ८ लाख ६५ हजार ६४४ स्थावर मालमत्ता होत्या. म्हणजेच सध्या वक्फ बोर्डाकडे ८ लाख एकरपेक्षा जास्त जमीन आहे.

# सासूचा खून करून सून बुलेटवर पसार...; मृतदेह पोत्यात भरून विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न फसला

जालना । प्रतिनिधी

सूनेने सासूची हत्या करून तिच्या मृतदेहाची पोत्यात भरून विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केल्याची भयंकर घटना जालना शहरातील भोकरदन नाका परिसरातील प्रियदर्शनी कॉलनी येथे घडली आहे. घरमालकाच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उजेडात आला. त्यानंतर आरोपी सून एका अज्ञात व्यक्तीच्या बुलेटवर बसून घटनास्थळावरून पसार झाली.

यासंबंधीच्या माहितीनुसार, सविता संजय शिनगारे (४५) असे मृत सासूचे नाव आहे. तर प्रतिक्षा शिनगारे असे आरोपी सूनेचे नाव आहे. सविता यांचा मुलगा लातूर येथे नोकरीनिमित्त राहतो. त्यामुळे सासू व सून या दोघी शहरातील प्रियदर्शनी कॉलनी येथे एका भाड्याच्या घरात राहत होत्या.



या दोघींमध्ये कोणत्याही तरी गोष्टीमुळे वाद झाला होता. या कौटुंबिक वादातून सूनेने बुधवारी पहाटे सासूचे डोके जोरात भिंतीवर आदळले. त्यात सासू सविता यांचा जागीच मृत्यू झाला. यानंतर प्रतिक्षा शिनगारेने मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी तो एका पोत्यात भरला. त्यानंतर ते पोते घराबाहेर आणले.

पहाटे ५.२८ च्या सुमारास हा प्रकार सुरू होता. घराबाहेर सुरू असणारी ही हालचाल घरमालकाच्या निदर्शनास आली. त्यानंतर त्यांनी लागलीच त्याची माहिती पोलिसांना दिली. घरमालकाची ही सतर्कता पाहताच आरोपी सून सासूचा मृतदेह तसाच सोडून घटनास्थळावरून पसार झाली. त्यानुसार पोलिस सून व बुलेटस्वाराचा शोध घेत आहेत.

**६ महिन्यांपूर्वीच झाला होता विवाह**

उल्लेखनीय बाब म्हणजे शिनगारे कुटुंब हे मूळचे बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील वावरे अंतरवाली येथील आहे. सविता यांचा मुलगा आकाश संजय शिनगारे यांचा ६ महिन्यांपूर्वीच परभणी येथील प्रतीक्षा हिच्यासोबत झाला होता. आकाश हा लातूर येथे खासगी नोकरीस आहे. त्यामुळे सविता व प्रतीक्षा या दोघीच जालन्यात किरायाच्या घरात राहत होत्या.

# खोटे नरेटिव्ह पसरवणाऱ्यांविरोधात एक लाख कोटींचा मानहानीचा दावा दाखल करणार-ॲड. निलेश ओझा

**मुंबई । प्रतिनिधी**

दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची सुनावणी बुधवारी मुंबई उच्च न्यायालयात होण्याची शक्यता आहे. या प्रकरणाची सुनावणी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर सूचीबद्ध करण्यात आलीय. मात्र, दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांचे वकील ड निलेश ओझा यांनी थेट न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांच्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलेत. न्या. डेरे यांच्या भगिनी वंदना चव्हाण या शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या माजी खासदार आहेत, त्याशिवाय इतर कारणांमुळे या प्रकरणाची त्यांच्यासमोर सुनावणी न होता हे प्रकरण मुख्य न्यायमूर्तींच्या



खंडपीठासमोर येण्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे.

**खोटी बातमी पसरवायची ही त्यांची मोडस ऑपरेंडी**

दिशा सालियन हिच्यावर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या झाल्याचा आरोप करीत २५ मार्च २०२५ रोजी सतीश सालियन यांनी तक्रार दाखल केलीय. त्या तक्रारीची दखल घेत असल्याचे शंभुराज देसाई यांनी विधिमंडळात ग्वाही दिलीय, त्यामुळे खोट्या बातम्या पेरणे, कारवाईची वेळ आल्यावर खोटी बातमी पसरवायची ही त्यांची मोडस ऑपरेंडी आहे, असा आरोप ओझा यांनी केला. असे केल्याने या प्रकरणाची सुनावणी राज्याबाहेर ट्रान्सफर होईल, असे देखील ते म्हणाले. या प्रकरणात शिवसेना नेते आदित्य ठाकरे, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासाठी खोटे नरेटिव्ह पसरवणाऱ्यांविरोधात सतीश सालियन यांच्यातर्फे एक लाख कोटींचा मानहानीचा दावा करणार असल्याची घोषणा ओझा यांनी यावेळी केली. त्यासाठी लागणारी कोर्ट फी रक्कम आम्ही भरू आणि रिकव्हरीनंतर मिळणाऱ्या रकमपैकी ९० टक्के लाडकी बहीण योजनेला देणार आणि १० टक्क्यांपैकी ९ टक्के रक्कम पत्रकारांना आणि १ टक्के सतीश सालियन यांना देणार असल्याचे ओझा म्हणालेत.

**अद्याप कोणताही क्लोजर रिपोर्ट नाही**

सीबीआयने क्लीन चिट दिली, असा खोटा दावा करण्यात आला. प्रत्यक्षात प्रकरणात अद्याप कोणताही क्लोजर रिपोर्ट नाही, आदित्य आणि इतर कोणालाही क्लीन चीट दिलेली नाही, क्लोजर रिपोर्ट रिकॉल करण्यात आला आहे. तसेच, आमच्या तक्रारीवर नव्याने तपास सुरू आहे, अशी माहिती त्यांनी दिली. दिशा सालियन प्रकरणात उद्या पूर्ण सुनावणी होणार नाही, तर हे प्रकरण उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींकडे पाठवले जाण्याची शक्यता आहे. मुख्य न्यायमूर्तींकडे दाखल असलेल्या जनहित याचिकेला हे प्रकरण संलग्न करून घ्यावे, अशी आमची मागणी आहे, आरोपींविरोधात गुन्हा दाखल करावा आणि साक्षीदारांना संरक्षण द्यावे, अशा मागण्या केल्याची माहिती ओझा यांनी दिली.

# महाराष्ट्रात वर्षभरात ५,११५ कोटी रुपयांचे 'टोल वसुली'

नवी दिल्ली । वृत्तसेवा

एप्रिल ते फेब्रुवारी दरम्यान महाराष्ट्रातून ५,११५ कोटी रुपयांचे टोल कलेक्शन झाले असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी संसदेत एका प्रश्नाचे उत्तर देताना दिली. गडकरी यांनी सांगितले की, या कालावधीत सर्वात जास्त टोल कलेक्शन उत्तर प्रदेशात झाले असून या राज्यात ७,०६० कोटी रुपयांचे टोल कलेक्शन झाले आहे.





राजस्थान राज्यात या कालावधीत ५,९६७ कोटी रुपयांचे टोल कलेक्शन झाले असल्याचे त्यांनी सांगितले. हे टोल कलेक्शन अपेक्षेप्रमाणे असल्याचेही गडकरी म्हणाले.वाहन चालकाना कमीत कमी अडथळा होईल अशा पद्धतीने टोल कलेक्शन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. वाहकांना टोल प्लाझावर थांबण्याची गरज पडणार नाही, अशा पद्धतीने टोल कलेक्शन बर्याच ठिकाणी करण्यात येत असून ही प्रक्रिया निरंतर चालू राहणार आहे.

काही रस्त्यावरून वारंवार प्रवास करणार्यांसाठी वार्षिक पासची सोय करण्याचा प्रयत्न करण्यात येत असून यावर सध्या काम चालू आहे. काही रस्ते सरकार तयार करीत आहे. तर काही रस्ते खासगी क्षेत्राची मदत घेऊन तयार करण्यात येत आहेत. २०१४-१५ मध्ये ३४,८०५ कोटी रुपयांची खासगी गुंतवणूक या क्षेत्रात झाली होती. २०२३-२४ मध्ये ३४,८०५ कोटी रुपयांची खागी गुंतवणूक या क्षेत्रात झाली असल्याची माहिती त्यांनी दिली.

# ना.अजित पवारांच्या बैठकीत आ.क्षीरसागरांनी मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न मांडले; प्रशासनाशी संबंधित आणि विकासाचे मुद्दे केले उपस्थित

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली विविध विकास कामांची तसेच शासकीय योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी (दि.२) रोजी पार पडली. या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न ना.अजित पवारांसमोर मांडले. यासोबतच प्रशासनाच्या संबंधित असलेले अनेक मुद्दे आ.क्षीरसागर यांनी उपस्थित केले.



बीड जिल्ह्यातील विकास कामे व शासकीय योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक बुधवारी (दि.२) रोजी ना.अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत ना.अजित पवारांनी जिल्ह्यात पूर्ण झालेल्या आणि सुरू असलेल्या विकासकामांचा तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. याप्रसंगी बीड विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी या नात्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील महत्वाचे असलेले अनेक प्रश्न मंत्री महोदयांसमोर मांडले.

## आ.संदीप क्षीरसागर यांनी मांडलेले मुद्दे

- एमआयडीसी भागात पोलीस चौकी उभारणी करणे.
- नरेगा अंतर्गत जी अनावश्यक कामे झाली आहेत त्यातील कुशलची कामे प्रमाणात झालेली नाहीत. अनावश्यक मागणी केल्याने आज रोजी जी कामे आवश्यक आहेत ती करण्यासाठी अडचण निर्माण होत आहे.
- राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ खरवंडी ते नवगण राजुरी रस्त्यावरील मौजे नवगण राजुरी, काटवटवाडी येथील संपादित प्रकरणात सुधारित निवाडा व निधी मागणी.
- खरवंडी-ब्रह्मनाथ येळंब-आर्वी-खालापुरी-नवगण राजुरी राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ ची सुधारणा करण्याबाबतचे काम गेल्या सात वर्षांपासून अपुर्ण आहे.
- बीड शहरातील जालना रोड ते छत्रपती शिवाजी महाराज चौक नाली बांधकाम करण्याबाबत मागणी केली. त्यास मा. मंत्री महोदयांनी सकारात्मकता दर्शविली.
- बीड नगर परिषद ने ओपन स्पेसच्या जागा अनियमितता करून बोगस वाटप केले आहेत. गुंठेवारी बोगस केलेली आहे. नगर परिषदेच्या फंडातून दुबार व निकृष्ट दर्जाची अनेक कामे केलेली आहेत. या सर्व प्रकरणातील मुळ संचीका नगर परिषद, बीड येथून गायब आहेत. तसेच नगरपरिषद प्रशासन बीड शहरातील स्वच्छता व पाणी पुरवठ्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे.

## टुकूर साठवण तलावाऐवजी कोल्हापुरी बंधार्यांसाठी केली आग्रही मागणी

खांडेपारगाव येथील मंजूर टुकूर साठवण तलावाच्य ऐवजी बीड तालुक्यात प्रस्तावित ठिकाणी नऊ कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यांना प्रशासकीय मान्यता मिळावी यासाठी आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक काळापासून शासन, प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत. बीड येथे पालकमंत्री ना. अजित पवार आले असता यावेळीही याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी या भागातील नागरिकांसह आग्रही मागणी केली.



यावेळी परिसरातील सर्व ग्रामस्थ मंडळीच्या प्रतिनिधींसह आ.क्षीरसागरांनी ना.अजित पवारांना याबाबत निवेदन दिले.

# सरकारकडून आंदोलनकर्त्यांची मुस्कटदाबी; डीपीआयचे अजिंक्य चांदणे दिवसभर पोलिसांच्या नजरकैदेत

**अजित पवारांच्या विरोधात सामाजिक अन्याय आंदोलन**

बीड । प्रतिनिधी

शासनाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्याचे अर्थमंत्री अजित पवारांनी सामाजिक न्याय विभागाचा हक्काचा निधी इतर खात्यात वर्ग केला असून हा सामाजिक अन्याय आहे. त्याविरोधात डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाकडून बुधवार (दि.२) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामाजिक अन्याय आंदोलन करण्यात आले. मात्र या कालावधीत डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांना, बीड पोलिसांनी दिवसभर नजरकैदेत ठेवले होते. सरकारकडून आंदोलन कर्त्यांची मुस्कटदाबी केली जात असून






अजित पवार यांच्या विरोधात निधी चोर अशी घोषणाबाजी करण्यात आली.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरोधात डीपीआयने बीड जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, समाज कल्याण विभागाचा वळविलेला निधी परत करण्यात आला पाहिजे. समाज कल्याण खात्याअंतर्गत येणाऱ्या सर्व महामंडळांना निधी उपलब्ध करुन द्यावा, तसेच लोकशाहीर आण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था आर्टी या नविन संस्थेला देखील निधी उपलब्ध करुन द्यावा, यासह विविध मागण्या निवेदनात करण्यात आलेल्या आहेत.

यावेळी सुभाष लोणके, सुनिल पाटोळे, नवनाथ कांबळे, बप्पा सोनवणे, केशव लोंढे, राजाभाऊ खंडागळे, बाळासाहेब पोळ, उषा चव्हाण, विष्णू अवचार, अमोल सुतार, बाळासाहेब दोडके, साईनाथ आडगळे, चंद्रसेन पाटोळे, आकाश पाटोळे, सुरेश गायकवाड, विजयकुमार पारवे आदी उपस्थित होते.

## सत्तेचा गैरवापर आणि...

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बीड जिल्हा दौरा होता. मुख्यमंत्री महोदयांनी समाज कल्याण विभागाचा निधी वळविल्याने डीपीआयकडून सामाजिक अन्याय आंदोलन पुकारण्यात आले होते. परंतू सत्तेचा गैरवापर करत बीड पोलिसांकडून अजिंक्य चांदणे यांना, दिवसभर नजरकैदेत ठेवण्यात आले होते. त्यामुळे या घटनेचा राज्यभरात निषेध नोंदविण्यात आला.

# महसूल विभागाचा आगळावेगळा उपक्रम : जिवंत सातबारा मोहिम

बीड । प्रतिनिधी

महसूल व वनविभाग , महाराष्ट्र शासनामार्फत सातत्याने शेतकऱ्यांच्या हितासाठी व कल्याणासाठी वेगवेगळ्या योजना राबवण्यात येत असतात. त्यापैकीच एक म्हणजे ' जिवंत सातबारा मोहिम'. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या निर्देशानुसार ही मोहीम संपूर्ण राज्यामध्ये राबवण्याचा उपक्रम सध्या सुरु आहे.

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण बीड तालुक्यात ही जिवंत सातबारा मोहीम राबवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सातबारा वरील सर्व मयत खातेदारांच्या नोंदीचे कामकाज पूर्ण करण्यासाठी बीड तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात जिवंत सातबारा मोहीम राबविली जात आहे.

कृती आराखडा –महसूल व वनविभाग महाराष्ट्र शासनातर्फे १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे . त्या अंतर्गत दिनांक १ एप्रिल २०२५ ते ५ एप्रिल २०२५ पर्यंत ग्राम महसूल अधिकारी ( तलाठी ) यांनी त्यांच्या सज्ञा अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये चावडी वाचन करून (न्यायप्रविष्ठ प्रकरणे सोडून) गाव निहाय मयत खातेदार यांची यादी तयार करून घ्यावयाची आहे. सध्या जिल्हाभरात ग्राम महसूल अधिकारी यासाठी फिरत आहेत. त्यानंतर दिनांक ६ एप्रिल २०२५ ते दिनांक २० एप्रिल २०२५ पर्यंत मयत खातेदारांच्या वारसांनी वारसा संबंधित आवश्यक कागदपत्रे (मृत्यू दाखला, वारसाबाबत सत्य प्रतिज्ञालेख, स्वयंघोषणापत्र/ पोलीसपाटील /सरपंच / ग्रामसेवक यांचा दाखला , सर्व वारसांचे नावे, वय , पत्ते व मोबाईल नंबर तसेच रहिवासी बाबतचा पुरावा ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्याकडे सादर करावयाचे आहेत. ग्राम महसूल अधिकारी योग्य ती चौकशी करून मंडळ अधिकाऱ्यांमार्फत वारस ठराव करण्यात येईल . त्यानंतर दिनांक २१ एप्रिल २०२५ ते १० मे २०२५ पर्यंत ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्याकडून ई फेरफार प्रणालीमध्ये ऑनलाईन वारस फेरफार तयार करून महसूल अधिनियम १९६६ च्या विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून मंडळ अधिकारी यांच्या मार्फत वारस फेरफारावर निर्णय घेऊन त्यानुसार सातबारा दुरुस्त करण्यात येईल. जेणेकरून सर्व जिवंत व्यक्ती सातबारावर नोंदविल्या जातील. सातबारा उताऱ्यावर मयत शेतकऱ्यांचे नाव असल्यामुळे अनुदानाची केवायसी करणे व इतर कामांमध्ये अडचण येताना दिसत होती.

बीड तालुक्यामध्ये एकूण २३६ गावे , १६ मंडळे , ८८ सज्जे असे एकूण १२०६९० शेतकरी खातेदार आहेत. यातील मयत खातेदार यांची यादी बनवून सर्वांपर्यंत या योजनेची माहिती पोहोचवण्यासाठी बीड तालुक्याचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी धडाडीने प्रयत्न सुरु केले आहेत. गावोगावी जाऊन प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत योजनेची माहिती देण्यासाठी सर्व नायब तहसीलदार व मंडळ अधिकारी यांचे प्रयत्न सुरु असणार आहेत. ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी १ एप्रिल पासूनच ८ अ उताऱ्याचे चावडी वाचन सुरु केलेले आहे.

# स्वा सावरकर उच्च माध्यमिक विद्यालयाची ऋचा कुलकर्णी न्यायधीश पदाच्या परिक्षेत राज्यात प्रथम



**स्वा सावरकर शैक्षणिक संकुल वतीने सत्कार व अभिनंदन**

**बीड । प्रतिनिधी**

स्वा. सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची माजी विद्यार्थिनी कु. ऋचा विठ्ठल कुलकर्णी ही न्यायाधीश पदाच्या परीक्षेत महाराष्ट्रात राज्यात प्रथम क्रमांकाने उतीर्ण झाली. यानिमित्ताने स्वा सावरकर शैक्षणिक संकुल बीड वतीने सत्कार व अभिनंदन करताना मुख्य प्रशासकीय अधिकारी मा. चंद्रकांत मुळे ,विद्यासभा उपाध्यक्ष उमेश जगताप, प्राचार्य मा. विठ्ठल काळे व विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब साळवे ङ्ग प्रा संतोष जोशी व शैक्षणिक संकुलातील सर्व शिक्षक प्राध्यापक यांनी अभिनंदन केले आहे.

# पुसऱ्यात भरदिवसा घरफोडी

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील पुसरा येथील शेतकरी आपल्या शेतात बाजरी काढण्यासाठी गेले असता (दि.३१) सोमवार रोजी दुपारी अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून घरामध्ये प्रवेश करत तब्बल २ लाख ९० हजार रुपायाच्या किंमतीचे सोन्याचे दागिने चोरट्याने लंपास केले आहेत.

वडवणी तालुक्यातील पुसरा येथील नारायण मारोती नाईकवाडे (वय ६४) हे आपल्या (थरवुरपळ)पत्नीसह शेतात बाजरी काढण्यासाठी (दि.३१)मार्च रोजी सकाळी ११ वाजता गेले होते. दिवसभर शेतात काम करुन घरी परत आल्यावर घराच्या गेटचे कुलुप तुटलेल्या अवस्थेमध्ये दिसून आले व घरातील पत्राच्या पेटीमधील साहित्य खाली जमिनीवर फेकण्यात आलेले होते. हे पाहून शेतकर्यांच्या लक्षात आले की घरात चोरी झाली आहे.त्यांनी तात्काळ वडवणी पोलिसांना या घटनेची माहिती दिली पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमन सिरसट, पोलीस नाईक विलास खरात, पो.काँ. इरमले, यांनी घटनास्थळी भेट देत तात्काळ पंचनामा केला.पत्राच्या पेटीमध्ये ठेवण्यात आलेले सोन्याचे दागिने घेऊन चोरटे पसार झाल्याचे निदर्शनास आले यामध्ये एकूण २०,९००० रु किंमतीचे सोन्याचे दागिने घेऊन चोरटे लंपास झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अल्पवयीन मेहुणीला दाजीने पळविले! फूस लावून पळवून नेल्याची तक्रार

केज । प्रतिनिधी

महाविद्यालयात शिक्षण घेत असलेली अल्पवयीन मुलगी ही कॉलेजला जाण्यासाठी घरातून निघाली. पण, ती कॉलेजला जाण्याऐवजी तिच्या आत्याच्या मुलाने (दाजी) पळवून नेले. सदर अल्पवयीन मुलीने ती तिच्या दाजी सोबत जात असल्याची चिठ्ठी घरी ठेवली. यानंतर तिच्या वडिलांच्या तक्रारीवरून तिचे अज्ञात कारणासाठी अपहरण झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

या बाबतची माहिती अशी की, केज शहरात एका लहान खेड्यात नियमित कॉलेजला जाणाऱ्या अल्पवयीन मुलीला तिच्या वडिलांनी वाटेतील बस थांब्यावर आणून सोडले. त्यानंतर वेळ टळून गेली तरी मुलगी घरी न आल्यामुळे तिच्या आई-वडिलांनी शोध घेतला. मात्र ती आढळून आली नाही. म्हणून घरच्या लोकांनी तिचे सामानाची झडती घेतली असता तिच्या पर्समध्ये एक चिठ्ठी आढळून आली. त्यात तिने त्यांच्या गावाशेजारी असलेल्या आत्याच्या मुलासोबत गेली असल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे मुलीच्या वडिलांच्या तक्रारी वरून गु. र. नं. १३०/ २०२५ भा. न्या. सं. १३७ नुसार तिच्या आत्याच्या मुलानेच अल्पवयीन मुलीला अज्ञात कारणासाठी पळवून नेले असल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. याचा तपास पोलीस उपनिरीक्षक सुकुमार बनसोडे हे करीत आहेत.

**चिठ्ठीत काय लिहिले?**

सदर अल्पवयीन मुलीने आई-वडिलांना उद्देशून वहीच्या पानावर लिहिलेल्या चिठ्ठीत असे लिहिले आहे की, पप्पा मला माफ करा आपली गरिबी आहे. म्हणून मी बबलु दाजी सोबत जात आहे.

# देवराई वनप्रकल्पाची दुरावस्था पाहून सयाजी शिंदेकडुन तिव्र नाराजी

## कायमस्वरूपी पाणी प्रश्न मिटवण्यासाठी डोकेवाडा साठवण तलावातुन पाणीपुरवठ्यासाठी अंदाज पत्रक;वनविभागाच्या अधिकाऱ्यांना सुचना

बीड । प्रतिनिधी

पहिले जागतिक वृक्षसंम्मेलन झालेल्या बीड तालुक्यातील पालवण येथील सह्याद्री देवराई या वनप्रकल्पाची दुरावस्था पाहुन सिने अभिनेते व देवराईचे प्रणेते सयाजी शिंदे यांनी हळहळ व्यक्त केली. देवराईच्या वनप्रकल्पातील झाडांची निगा व संगोपनाबाबत आणि वारंवार लागणा-या आगीच्या अनुषंगाने वन अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

सिने अभिनेते सयाजी शिंदे यांच्या संकल्पनेतून बीड तालुक्यातील पालवण येथील डोंगरावर २०१७ साली सह्याद्री देवराई हा वनराईचा प्रकल्प उभारण्यात आला होता. वनसंवर्धनासाठी उचलण्यात आलेले हे पाऊल कौतुकाचा विषय होता. शहरापासून जवळ असल्याने बीडकर याठिकाणी सकाळी सायंकाळी फिरण्यासाठी जात होते. सुरूवातीला या प्रकल्पाकडे चांगले लक्ष दिल्याने प्रकल्प हिरवागार होता. मात्र मागील २-३ वर्षांपासून वनविभागाचे याकडे दुर्लक्ष झाले.सामाजिक कार्यकर्त्यांचा ओढा कमी झाल्याने देवराईची दुरावस्था होण्यास सुरुवात झाली. राज्यात सर्वात कमी वनक्षेत्र असलेल्या बीड जिल्ह्यात उभारलेली या वनराईचे नियोजना अभावी वाळवंट झाले. पहिले ३ वर्षे जिल्हा नियोजन योजनेंतर्गत पाण्यासाठी निधी देण्यात आला होता.त्यानंतर उद्योजक सुरेश कुटे आर्थिक अडचणीत आल्यानंतर त्यांनी प्रायोजिकत्व स्विकारलेले पाण्याचे टँकर बंद झाल्याने दिड वर्षांपासून देवराई पाण्याविना होती. जिल्हा प्रशासनाने जिल्हा नियोजन योजनेतुन निधी द्यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर व सहका-यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेशरमांची झाडांची लागवड करत लक्ष्यवेधी आंदोलन करून जिल्हा प्रशासन व वनविभागाचे लक्ष्य वेधण्याचा प्रयत्न केला होता.




## देवराईची दुरावस्था पाहुन सयाजी शिंदे कडुन नाराजी

सह्याद्री देवराई वनप्रकल्प आगीच्या भक्ष्यस्थानी पडण्याच्या घटना वारंवार घडत असुन आठवड्यापूर्वी लागलेल्या आगीत जवळपास ५ एकरचे जंगल जळुन भस्मसात झाले होते. पिंपळ ,वड , कडुनिंब आदि वृक्ष जळुन नष्ट झाले होते.या पार्श्वभुमीवर काल दि.१ एप्रिल मंगळवार रोजी सायंकाळी सयाजी शिंदे यांनी देवराई वनप्रकल्पाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी देवराई परीसरात काही अपप्रवृत्तीचे लोक येऊन दारू, सिगारेट पार्ट्या करतात हे त्या ठिकाणी पडलेल्या काडीपेट्या ,प्लास्टिकच्या बाटल्या,वेफर्स कागदावरून लक्षात आले. त्यामुळे या गोष्टीवर प्रतिबंध घालण्यात यावा.संबंधित प्रकरणी कठोर कारवाई करण्यात यावी अशा सुचना वनविभागाचे अधिकारी गर्कळ, अशोक काकडे यांच्यासह इतर वनकर्मचा-यांना केल्या.तसेच वनप्रेमी आणि बीडकरांनी देवराई वनप्रकल्प जपण्याचे आवाहन केले.

## देवराई वनप्रकल्पासाठी डोकेवाडा साठवण तलावातुन पाणीपुरवठा अंदाजपत्रक

दरवर्षी उन्हाळ्यात भेडसावणारा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकालात काढण्यासाठी डोकेवाडा साठवण तलावातुन पाणीपुरवठा करण्यासाठी नविन अंदाज पत्रक बनविण्यात आले असुन जिल्हा नियोजन अथवा ईतर कोणत्याही योजनेंतर्गत मंजुरी मिळावी यासाठी सयाजी शिंदे हे पालकमंत्री अजित पवार आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या कडे मागणी करणार असल्याचे डॉ.प्रदिप शेळके यांनी सांगितले.

यावेळी डॉ.प्रदीप शेळके, शिवराम घोडके, सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, अभिमान खरसाडे,देवराई ट्रेकिंग ग्रुपचे सदस्य श्रीकृष्ण उबाळे,लक्ष्मण मळेकर, विलास उनवणे, राम फाळके, हरिओम क्षीरसागर यांच्या सह पर्यावरण प्रेमी नागरीक उपस्थित होते.

हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी कल्पना अक्षर मुद्रणालय पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक- विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)

"Printed by Vilas Digambarrao Dolse, Published byVilas Digambarrao Dolse, on behalf of Vilas Digambarrao Dolse, and Printed at Kalpana Akshar Mudranalaya Patoda (414204), Dist. Beed. and published from Eveing Daily Patoda Sanchar in front of Bus Stand, Patoda Dist. Beed Editor Vilas Dolse,(Beed Justice)